# नियमित दिवाणी दावा क्रमांक ६५/२०२०.

MHKO120002442020

## निशाण क्रमांक ४५ खालील आदेश.

( सदाशिव भांदिगरे वि. दत्तात्रय कोराणे वगैरे )

अर्जदार यांनी प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ नियम ०३ नुसार वादी चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी केला आहे. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार वादी सदाशिव बाळू भांदीगरे हे दिनांक ०५/०३/२०२१ रोजी मयत झाले आहेत. त्यामुळे, प्रकरण गुणदोषांवर चालविण्यासाठी मयत वादी यांचे वारस अभिलेखावर येणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. प्रस्तुत अर्जावर यातील वि.प. यांनी त्यांचे म्हणणे सादर करून सदर मंजूर करण्याची विनंती केली आहे.

०२. अभिलेखावरील दाखल निशाणी क्र. ४८ कडील मृत्युपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी सदाशिव बाळू भांदीगरे हे दिनांक ०५/०३/२०२१ रोजी मयत झाले आहेत. प्रस्तुत प्रकरण हे प्रतिवादी यांचे विरुध्द कायम मनाईसाठी दाखल केलेले आहे. त्यामुळे, प्रस्तुत प्रकरण हे गुणदोषांवर निर्गमित करण्यासाठी, मयत वादी यांचे वारस अभिलेखावर येणे आवश्यक आहे. तसेच, प्रस्तुत अर्ज हा मुदतीमध्ये सादर केला असल्यामुळे, मी पुढीलप्रमाणे आदेश करत आहे.

## आदेश.

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार यांनी पुढील तारखेपर्यंत दाव्यात दुरुस्ती करून मयत वादी सदाशिव बाळू भांदीगरे यांचे वारस अभिलेखावर नोंदवून घ्यावेत.

३. अर्जदार यांनी पुढील तारखेपर्यंत दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर सादर करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by VASIM BURAN MULLA
Date: 2022.06.14 17:13:35 +0530

दिनांक. १४/०६/२०२२.  **( व्ही. बी. मुल्ला )**

ठिकाण. गारगोटी.  दिवाणी न्यायाधीश क. स्तर, गारगोटी.